**स्थापत्यविषयक कामाच्या बाबतीत अंदाजपत्रकातील उपबाबी (Sub-items) रकमांहून अधिक खर्चाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : सुप्रमा.-२०२६/ प्र.क्र.११३/ रस्ते-५**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक : २२ ऑक्टोबर २०२६**

**<u>संदर्भ</u>** :- १) शासन परिपत्रक क्र. सुप्रमा-२०२६/ प्र.क्र.७३/ रस्ते-५, दि. ०३ जुलै, २०२६.
२) शासन निर्णय क्र. बीजीएम/ २०२३/ प्र.क्र.८७/ अर्थ-१, दि. १६ फेब्रुवारी, २०२४.
३) शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.९६/ इमा-२, दि. ०६ नोव्हेंबर, २०२३.

## शासन परिपत्रक

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांच्या कामांचे "मूळ बांधकामे" व "दुरुस्ती आणि परिरक्षण" या दोन प्रकारांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. विभागाकडून हाती घेण्यात येणाऱ्या प्रत्येक बांधकामासाठी (दुरुस्ती वगळून) खात्याची प्रशासकीय मान्यता मिळविणे आवश्यक आहे. ही प्रशासकीय मान्यता म्हणजे एखादे विनिर्दिष्ट बांधकाम ठराविक रकमेमध्ये पार पाडण्यासंबंधातील विभागाची मंजुरी असते. प्रशासकीय मान्यतेनुसार सा. बां. विभागासाठीच्या विविध योजनांतर्गतच्या वित्तीय तरतुदीनुसार प्राप्त होणाऱ्या निधीच्या मर्यादेत तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया पूर्ण करुन प्रत्यक्षात कामे हाती घेतली जातात. ही कामे प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेतच पूर्ण करणे अपेक्षित असते. कामावरील खर्च प्रशासकीय मान्यता किंमतीच्या मर्यादेत ठेवणे ही बाब वित्तीय शिस्तीचा भाग असून यावरील नियंत्रण राखणे ही क्षेत्रिय अधिकारी व नियंत्रण अधिकारी यांची प्राथमिक जबाबदारी आहे.

प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व प्रारुप निविदा किंमत यामध्ये अंतर्भूत करावयाच्या घटकांबाबत दि. १६ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यामध्ये नमूद घटकांचा साधारणपणे, बांधकामाच्या किंमतीचा भाग (मूळ कामाची किंमत Work Portion + स्वामित्व धन Royalty + साहित्य चाचणी रक्कम Q.C. Testing charges + वस्तू व सेवाकर GST + कामगार विमा Labour insurance) हा भाग १ व अनुषंगिक खर्चाचा भाग (आकस्मिक खर्च Contingencies + प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार Project Management Consultant + भाववाढ Escalation + रस्ते व पूलांचे सुरक्षा परीक्षण Road Safety Audit) हा भाग-2 असे दोन भाग करता येतील.

बांधकामाच्या किंमतीच्या भागातील मूळ कामाची किंमत निश्चित करताना पुरेसे सर्व्हेक्षण, अन्वेषण व त्यानुसार सविस्तर मोजमापे आणि दर निश्चित करुन कामाची किंमत अचूकपणे निश्चित करणे सहजसाध्य आहे. या अचूक अंदाजानुसार कामाच्या किंमतीवर नियंत्रण शक्य होते. तथापि, पुरेसा तपशिल व जागेवरील आवश्यकता विचारात घेऊन अचूक किंमत निश्चित करणे शक्य असताना, आकस्मिक खर्च वगळता कामाच्या अन्य अनुषंगिक बाबीं/ उपशिर्षांचा खर्च ढोबळ मानाने गृहीत धरला जातो ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मूळ कामाच्या किंमतीवरील खर्चासाठीची मर्यादा आखून दिली असली तरी, अनुषंगिक बाबींवरील व उपबाबींवरील (Sub-items) खर्चामध्ये वाढ करुन त्यानुसार सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीचे प्रस्ताव शासन स्तरावर सादर होत असल्याचे निदर्शनास येत आहे. अशा प्रस्तांवामुळे नियोजन व वित्त विभागाने बऱ्याच प्रकरणी गंभीर नोंद घेऊन यासाठी जबाबदार असणाऱ्यांवर कार्यवाही करावी असे नमुद केले आहे. त्यामुळे या प्रकारची कार्यपध्दती टाळून वित्तीय मर्यादांचे कटाक्षाने पालन होण्याकरिता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. सदर सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करावे.

(१) दि. ०३ जुलै, २०२६ च्या शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांन्वये व्यय अग्रक्रम समितीच्या शिफारशीनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता देण्यास सक्षम प्राधिकारी यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. याप्रमाणे आता, प्रशासकीय मान्यता रकमेपेक्षा कुठल्याही जादा खर्चाचे अधिकार क्षेत्रिय अधिकाऱ्यांना नाहीत याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. या मार्गदर्शक सूचनांनुसार कामावरील खर्च प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत ठेवणे अनिवार्य आहे.

(२) कामावरील खर्च प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत ठेवण्याकरिता अचूक सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात येऊन निविदा प्रक्रिया व कार्यान्वयनाच्या कालमर्यादा पाळल्यास कामाच्या बांधकाम किंमतीवर (Work Portion) नियंत्रण जसे शक्य आहे, त्याचप्रमाणे अनुषंगिक बाबीं/ उपशिर्षांच्या किंमती (उदा. सेवावाहिन्या स्थलांतर, भूसंपादन, इतर शासकीय शुक्ल/फी, इ.) ढोबळ मानाने न घेता, त्या, कामाच्या जागेवरील नेमक्या आवश्यकतांची सविस्तर तपासणी करुनच निश्चित कराव्यात, जेणेकरुन, प्रत्यक्षात कार्यान्वयनाच्या वेळी त्या बाबीं/ उपशिर्षावरील खर्च प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रकातील विहीत किंमतीच्या मर्यादेत राहील. सेवावाहिन्या स्थलांतरणाची बाब गृहीत धरताना फक्त आहे त्या वाहिनीचे स्थलांतरण- पुर्नस्थापन गृहीत धरणे आवश्यक आहे. स्थलांतरणाच्या बाबीमध्ये सेवावाहिन्यांची क्षमता वाढ व दर्जोन्नती (Capacity Augmentation & Upgradation) गृहीत धरणे अपेक्षीत नाही. अशी बाब गरजेची असल्यास ही सेवावाहिनी ज्या शासकीय विभागाची आहे त्यांनी या सेवांच्या दर्जोन्नतीचा व क्षमतावाढीचा खर्च त्यांच्या विभागातर्फे करणे अपेक्षीत आहे याची नोंद घ्यावी.

(३) सा. बां. नियमावली परिशिष्ट-४२ अनुक्रमांक १३ (६) अन्वये राज्य स्थापत्यविषयक कामांच्या बाबतीत अंदाजपत्रकातील उपशिर्षातील रकमांहून अधिक खर्चास क्षेत्रिय अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सदर अधिकचा खर्च संमत करण्याचे अधिकार सुधारित प्रशासकीय मान्यता मिळविण्यात येईल या परंतुकाच्या अधीन आहेत. नुकत्याच शासनास सादर झालेल्या काही सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रकरणांमध्ये उपशिर्ष/उपबाबी यावरील मंजूर रकमेपेक्षा जास्त खर्चास मंजुरी दिल्याने (उदा. भूसंपादन, सेवावाहिन्या स्थलांतर,ई.) प्रकल्पाचा मुळ वाव पुर्ण होत नसल्याचे व परीणामी प्रकल्पाची उपयुक्तता सिध्द होत नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे या परिपत्रकाद्वारे मंजुर कामाच्या उपबाबींत (Sub-items) सुद्धा प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त/जादाचा खर्च करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर प्रदान करण्यात आलेले सर्व अधिकार याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. काही अपरिहार्य प्रकरणात अशा प्रकारे उपशिर्षातील बाबींच्या मंजुर रकमेपेक्षा जादाचा खर्च करावयाचा असल्यास त्यासाठी मुळ प्रशासकीय मान्यता ज्यांनी प्रदान केली आहे, त्या प्राधिकाऱ्यांची मान्यता घ्यावी. अर्थात असे करताना क्षेत्रीय स्तरावरील प्राधिकाऱ्यांनी कामावरील एकूण खर्च प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधीक होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मंजूर रकमेपेक्षा उपबाबींवर (Sub-items) जादाचा खर्च करावा लागत असल्यास त्यासाठी शासन मान्यतेस्तव सादर करावयाच्या प्रस्तावासोबत अपुरे सर्व्हेक्षण व अपुऱ्या तरतुदींसाठी जबाबदारी निश्चित करावी, व तद्नंतरच या बाबीतील वाढीव खर्चास व Change of Scope यास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

(४) उपरोक्त (१) ते (३) प्रमाणे नमूद तांत्रिक व आर्थिक शिस्तीच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सुचनांचे सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६१०२२१२०६४७२११८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचा आदेशानुसार व नावाने.

SHAILENDRA SAHEBRAO BORASE

Digitally signed by SHAILENDRA SAHEBRAO BORASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Works Department, 2.5.4.20=6FC86C9CF78A99B4EB59DF32D1FA7085D30EF3D6BA9BE2D6D9AF10F1268319B8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4B90C6C84296B347D3553DCCEF07A19168E6BD51610DE7F6F3DB47C9CDFAAE5A, cn=SHAILENDRA SAHEBRAO BORASE
Date: 2026.10.22 12:09:01 +05'30'

**( शैलेंद्र बोरसे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई

४) मंत्रालयीन सर्व विभागातील अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव

५) महालेखापाल-१, मुंबई

६) महालेखापाल-२, नागपूर

७) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई / नागपूर